मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिन्नर

संरक्षण व सामरीक शास्त्र

सर्जिकल स्ट्राईक दिन अहवाल

दि.२९/०९/२०२१

भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम व स्मरणकरण्यासाठी आणि आजच्या सैनिकांना ऊर्जा मिळण्यासाठी २९ सप्टेंबर २०२१ हा सर्जिकल स्ट्राईक दिन म्हणून साजरा केला जातो यात प्रत्येक भारतीयाने देखील सहभागी होऊन देशप्रेम, राष्ट्रीय एकता निर्माण करण्यासाठी हा दिन साजरा करावा असे प्रतिपादन ताहाराबाद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एम एल साळी यांनी सिन्नर महाविद्यालयात आयोजित केलेल्या सर्जिकल स्ट्राईक दिन प्रसंगी प्रतिपादन केले.

या प्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.पी.व्ही.रसाळ प्रमुख वक्ते प्राचार्य.डॉ एम.एल.साळी,उपप्राचार्य प्रा.आर.व्ही.पवार, डॉ.डी.एम.जाधव, प्रा. व्ही एस सोनावणे आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य. डॉ एम.एल.साळी यांनी आपल्या मनोगतात सर्जिकल स्ट्राईक दिन पूर्ण शौर्य गाथा सांगितली त्यामध्ये भारताने पाकव्याप्त काश्मीर मध्ये सर्जिकल स्ट्राईक करून पाकिस्तान मधील दहशतवाद्यांना धडा शिकवला. या गोष्टीला आज पाच वर्ष होत आहे तेव्हापासून हा दिवस सर्जिकल स्ट्राईक दिन म्हणून साजरा केला जातो भारतीय सैन्य दलाने अतिशय खडतर परिस्थितीचा सामना करून सर्जिकल स्ट्राईक यशस्वी केले.

पाक व्याप्त काश्मीर क्षेत्र हे समुद्र सपाटी पासून अतिशय उंच असल्या कारणाने तेथे सैन्य आणि शस्त्रसाठा घेऊन जाणे भारतीयांसाठी अतिशय मुश्किल होते भारतीय सैनिकांनी सुरुवातीला लाईन ऑफ कंट्रोल पार करून पाक व्याप्त काश्मीर क्षेत्रात दहशदवाद्यांच्या चौक्यावर हल्ला केला ही बाब पाकिस्तानच्या उशिरा निदर्शनास आली याची शहानिशाकरण्यासाठी पाकिस्तानी सैन्याने सैनिकांची एक तुकडी पाक व्याप्त काश्मीर भागात पाठवली त्यावेळी दोन्ही सैन्यांचा एकमेकावर गोळीबार सुरू झाला यात दहशदवाद्यांबरोबर पाकिस्तानी दोन सैनिक मारले गेले. हे स्ट्राईक एक दिवस चालले भारतीय सेनेने स्ट्राईकला ऑपरेशन बंदार असे नाव दिले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी मोगल साम्राजाविरोध दोन सर्जिकल स्ट्राईक केले होते असे हि त्यांनी प्रतिपादन केले

हे युद्ध आधुनिक इतिहासातील अतिउंचीवरचे सर्जिकल स्ट्राईक अति उत्कृष्ट उदाहरण आहे यात युद्धाला लागणारी सामग्री व मनुष्य बळने-आण करण्याचा चांगलाच अनुभव भारतीय सैन्याला मिळाला हे युद्ध दोन्ही देश अण्वस्त्र सज्ज झाल्यानंतरचे पहिलेच स्ट्राईक होते त्यामुळे सर्व जगाचे लक्ष लागले होते परंतु भारताने हे स्ट्राईक मर्यादित ठेवले त्यामुळे दाखवलेल्या प्रेमाबद्दल भारताचे जगभर कौतुक झाले म्हणूनच भारताला आंतरराष्ट्रीयस्तरावर पाठिंबा मिळाला याउलट सैन्यमागे घ्यावी यासाठी

सर्जिकल स्ट्राईक हे भारतीय माध्यमांसाठी एक मैलाचा दगड ठरले या वेळेस भारतीय प्रसारमाध्यमांनी जागतिकीकरणात उडी घेतली होती आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वाहिन्यांच्या दर्जा गाठण्या सुरुवात केली होती भारतीय सैन्याने ही यात मागे न राहता माध्यमांचा वापर काळजीपूर्वक व आपल्या सोयीकरता करून घेतला भारतीय सैन्याला सहानुभूती मिळवण्याचा सोपे गेले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य व संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभाग प्रमुख प्रा. आर व्ही पवार यांनी सर्जिकल स्ट्राईक म्हणजे भारतीय सैनिकांनी नियोजित बद्ध हल्ला पाकव्याप्त काश्मीर मध्ये केलेला होता.भारत पाकिस्तान या दोन देशात जम्मू काश्मीर या भागावरून संघर्ष सुरु आहेत स्वातंत्र्य झाल्यापासून भारत-पाकिस्तान

मध्ये चार युद्ध झाली या चार हि युद्धमध्ये पाकिस्तान चा पराभव झाला त्यामुळे पाकिस्तानला कळून चुकले कि भारता बरोबर प्रत्यक्ष युद्धात आपण विजय होणे शक्य नाही म्हणून पाकिस्तान भारतात दहशद वादी कार्यवाही करून अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. १६ सप्टेबर २०१६ रोजी असाच एक दहशद वादी हल्ला पाकिस्तान पुरस्कृत झाला त्या हल्ल्याचा प्रतिशोध घेण्यासाठी भारताने २८ सप्टेंबर २०१६ रोजी सर्जिकल स्ट्राईक केले. त्यानंतर भारत सरकारने २९ सप्टेंबर हा दिवस सर्जिकल स्ट्राईक दिन साजरा करण्याचा आदेश दिला असे प्रतिपादन प्रा आर व्ही पवार यांनी केले

या कार्यक्रमासाठी कनिष्ठ-वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डि.के.खूर्चे तर आभार डॉ .डी.बी.वेलजली यांनी केले.

प्रा आर.व्ही.पवार
विभाग प्रमुख

डॉ.पी.व्ही.रसाळ
प्राचार्य